# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे महत्त्व आणि आव्हाने : एक अभ्यास

**रुपेश वासुदेव पाटील**
संशोधक विद्यार्थी,
पीपल्स कॉलेज , नांदेड

**डॉ. किशन एस. बाभुळगावकर**
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय
वसमत, जि. हिंगोली

**गोषवारा:**

भारत हा कृषिप्रधान देश असून आजही देशातील सुमारे ५० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्या हि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. परंतु भारतातील शेती व्यवसाय हा नैसर्गिक, आर्थिक व सामाजिक अश्या विविध अडचणींमुळे संकटात सापडलेला आहे. हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्चात वाढ, बाजारभावातील चढ-उतार, कर्जबाजारीपणा आणि उत्पन्नातील अस्थिरता यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कमकुवत होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देण्यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (PM-KISAN) सुरू केली आहे. या योजने मार्फत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,००० रुपये इतकी रक्कम दोन हजार रुपयाच्या समान तीन हप्त्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. ही योजना शेतकऱ्यांच्या शेती मधील तातडीच्या गरजा भागविण्याच्या उद्देशाने सुरु आहे. परंतु योजनेची अंमलबजावणी करताना अनेक प्रशासकीय, तांत्रिक व सामाजिक अडचणी निर्माण होत आहेत. या संशोधन निबंधात किसान सन्मान निधी योजनेचे स्वरूप, उद्दिष्टे, महत्त्व, शेतकऱ्यांच्या जीवनावर होणारा परिणाम तसेच योजनेसमोरील विविध आव्हाने यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. शेवटी योजनेची परिणामकारकता वाढविण्यासाठी योग्य निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

**मुख्य शब्द :** किसान सन्मान निधी योजना, शेती, शेतकरी, शासन, आर्थिक विकास

**प्रस्तावना:**

आजही शेतीकडे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून पाहिले जाते. स्वातंत्र्यानंतर भारताने औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात प्रगती केली असली, तरीही शेतीचे महत्त्व आजही अबाधित आहे. ग्रामीण भागातील रोजगार, अन्नसुरक्षा, कच्चा माल पुरवठा आणि निर्यात यामध्ये शेतीचा मोलाचा वाटा आहे. तथापि, शेतकरी वर्ग अनेक वर्षांपासून आर्थिक असुरक्षिततेचा सामना आहे. यामध्ये लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. आज शेती उत्पादनाचा खर्च वाढत आहे, तुलनेने उत्पन्न मात्र वाढत नाही. परिणामी शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकतो. अश्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याच्या हेतूने शासनामार्फत २४ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू करण्यात आली. ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत असून देशभरात कोट्यवधी शेतकरी योजनेचा लाभ घेत आहेत. तथापि, योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी दिसून येतात. काही पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहतात, तर काही अपात्र शेतकरी लाभ घेतात. म्हणून या योजनेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत शोध निबंधाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. किसान सन्मान निधी योजनेची उद्दिष्टे आणि कार्यपद्धती समजून घेणे.
२. शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर योजनेचा होणारा परिणाम अभ्यासाने.
३. योजनेच्या अंमलबजावणी बाबत येणारी आव्हाने व अडचणी यांचा अभ्यास करणे.
४. योजनेची उपयुक्तता वाढविण्यासाठी योग्य त्या शिफारशी सुचविणे.

**संशोधनाचे महत्व:**

किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देणारी भारत सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. योजनेमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात कितपत स्थैर्य आले आहे, तसेच शेतीसाठी लागणाऱ्या मूलभूत खर्चाची पूर्तता करण्यास ही योजना किती उपयुक्त ठरते याचा अभ्यास करणे या संशोधनातून योजनेतील प्रशासकीय त्रुटी, तांत्रिक अडचणी, लाभार्थी निवडीतील त्रुटी, तसेच अपात्र लाभार्थ्यांचा समावेश यांसारख्या समस्या उघडकीस आणून या समस्या सोडविण्यासाठी आणि हि योजना आधीक समाज उपयुक्त करण्यासाठी काय उपाय योजन करता येतील हे अभ्यासणे गरजेचे आहे.

**माहितीचे स्रोत :**

सदर अभ्यास विषयाचे विवेचन हे प्रामुख्याने दुय्यम सामग्रीवर आधारित असून यामध्ये माहिती गोळा करण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन यांचे वार्षिक अहवाल, किसान सन्मान निधी योजनेशी संबंधी असणारी पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे यांच्यासह काही शासकीय संकेतस्थळ यांचा संदर्भ घेण्यात आला आहे.

**योजनेचे उद्देश:**

१. अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांना आर्थिक आधार देऊन त्यांना आर्थिक स्थिरता देणे.
२. पिकासाठी आवश्यक तण, खत, बियाणे इत्यादी खरेदीसाठी शेतकऱ्यांना मदत करणे आणि शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे.
३. शेतकऱ्यांना कर्ज किंवा सावकारांकडे अवलंबून राहण्याची गरज कमी करणे.
४. अर्थसहाय्याचा निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ट्रान्सफर करून मध्यमवर्गीय प्रणाली कमी करणे.

**योजनेतील लाभार्थी आणि लाभ वितरणाचा आढावा:**

योजना सुरु झाल्यापासून मार्च २०२५ पर्यंत या योजनेतील लाभार्थी तसेच त्यांना वितरीत केलेली एकूण रक्कम यामध्ये वेगवेगळया वर्षी झालेला चढ-उतार याचा संक्षिप्त आढावा खालील तक्त्यामध्ये देण्यात आला आहे.

**किसान सन्मान निधी योजना: हप्तानिहाय लाभार्थी संख्या आणि वितरित रक्कम**

| हप्ता क्र. | हप्ता कालावधी | लाभार्थी संख्या ( हजारांमध्ये ) | वितरित रक्कम (रु. कोटींमध्ये) |
|---|---|---|---|
| १. | डिसेंबर २०१८ ते मार्च २०१९ | ३,१६,२१.७४ | ६,३२४.३५ |
| २. | एप्रिल २०१९ ते जुलै २०१९ | ६,००,३४.८६ | १३,२७२.०१ |
| ३. | ऑगस्ट २०१९ ते नोव्हेंबर २०१९ | ७,६६,०१.०३ | १७,५२७.१३ |
| ४. | डिसेंबर २०१९ ते मार्च २०२० | ८,२०,९१.६७ | १७,९४३.०० |
| ५. | एप्रिल २०२० ते जुलै २०२० | ९,२६,९४.०० | २०,९८९.४९ |
| ६. | ऑगस्ट २०२० ते नोव्हेंबर २०२० | ९,७२,२७.५५ | २०,४७६.३३ |
| ७. | डिसेंबर २०२० ते मार्च २०२१ | ९,८४,७६.२० | २०,४७५.१५ |
| ८. | एप्रिल २०२१ ते जुलै २०२१ | ९,९९,१७.९६ | २२,४१६.१९ |
| ९. | ऑगस्ट २०२१ ते नोव्हेंबर २०२१ | १०,३४,४७.२९ | २२,३९५.७९ |
| १०. | डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ | १०,४१,६८.५१ | २२,३४३.५५ |
| ११. | एप्रिल २०२२ ते जुलै २०२२ | १०,४८,४५.१६ | २२,६१८.८० |
| १२. | ऑगस्ट २०२२ ते नोव्हेंबर २०२२ | ८,५७,४०.७४ | १८,०४२.०८ |
| १३. | डिसेंबर २०२२ ते मार्च २०२३ | ८,१२,३८.९२ | १७,६५०.६१ |

| हप्ता क्र. | हप्ता कालावधी | लाभार्थी संख्या ( हजारांमध्ये ) | वितरित रक्कम (रु. कोटींमध्ये) |
|---|---|---|---|
| १४. | एप्रिल २०२३ ते जुलै २०२३ | ८,५६,७९.०९ | १९,२०३.९३ |
| १५. | ऑगस्ट २०२३ ते नोव्हेंबर २०२३ | ८,१२,१६.७० | १९,५९६.८१ |
| १६. | डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ | ९,०४,४४.६९ | २३,०९२.२९ |
| १७. | एप्रिल २०२४ ते जुलै २०२४ | ९,३८,०१.५८ | २१,०५७.१३ |
| १८. | ऑगस्ट २०२४ ते नोव्हेंबर २०२४ | ९,५९,२८.६३ | २०,६६६.२० |
| १९. | डिसेंबर २०२४ - मार्च २०२५ | १०,०६,८५.६२ | २३,५००.८३ |

स्रोत: Press Information Bureau (PIB), Tuesday, 29 July 2025

वरील तक्त्यामध्ये आपणास दिसून येते कि डिसेंबर २०१८ ते मार्च २०१९ या पहिल्या हप्त्यात सुमारे ३.१६ कोटी लाभार्थी होते व ६,३२४ कोटी रुपये वितरित करण्यात आले. योजनेच्या सुरुवातीच्या टप्प्यात लाभार्थी नोंदणी मर्यादित असल्याने संख्या व रक्कम तुलनेने कमी होती. मात्र एप्रिल २०१९ ते जुलै २०१९ या कालावधीत लाभार्थी संख्या दुपटीहून अधिक वाढून ६ कोटींहून अधिक झाली, यावरून योजनेचा वेगाने विस्तार झाल्याचे दिसते.

२०१९–२० ते २०२१–२२ या कालखंडात लाभार्थी संख्या सातत्याने वाढत जाऊन सुमारे १०.४ कोटींपर्यंत पोहोचली. याच काळात वितरित रक्कमही ६,३२४.३५ कोटी वरून २२,६१८.८० कोटी रुपयांपर्यंत पोहचली आहे. विशेषतः कोविड-१९ काळात ही योजना शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार ठरली. मात्र ऑगस्ट २०२२ नंतर लाभार्थी संख्येत घट दिसून येते. आधार-लिंक करणे, e-KYC, अपात्र लाभार्थ्यांची छाननी यांमुळे ही घट झाली असावी. तरीही २०२३–२४ व २०२४–२५ या काळात लाभार्थी संख्या पुन्हा वाढून १० कोटींच्या आसपास पोहोचली असून वितरित रक्कम २३,५०० कोटी रुपये इतकी उच्च पातळीवर पोहचली आहे.

थोडक्यात PM-KISAN योजना कालांतराने अधिक व्यापक, पारदर्शक व आर्थिकदृष्ट्या प्रभावी ठरलेली आहे . २०२२ नंतर लाभार्थी छाननीमुळे तात्पुरती घट झाली असली तरी योजनेचा दीर्घकालीन प्रभाव सकारात्मक आहे.

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे महत्त्व**

**थेट लाभाद्वारे शेतकऱ्यांचे सक्षमीकरण**

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तांतर होत असल्याने त्यांचे सक्षमीकरण होत आहे. या योजनेत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये इतका आर्थिक लाभ थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत असून, थेट दोन हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये वितरीत केले जातात. थेट लाभ हस्तांतरण प्रणालीच्या वापरामुळे मध्यस्थ, विलंब आणि भ्रष्टाचार संपुष्टात आला असून, शंभर टक्के निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात येतो. या योजनेच्या अंमलबजावणीपासून आतापर्यंत एकूण ३.६९ लाख कोटींपेक्षा अधिक निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. एवढी मोठी रक्कम या योजनेच्या माध्यमातून थेट लाभार्थ्यांना हस्तांतरित झाल्यामुळे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी ही योजना जगातील सर्वात मोठ्या डिजिटल थेट रोख लाभ हस्तांतरण योजनांपैकी एक ठरली आहे. खरेतर, या योजनेतील आकड्यांचा विचार होणे मर्यादित ठरेल. कारण शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानामुळे ते त्याचा उपयोग बी-बियाणे, शेती उपकरणे, शिक्षण, आरोग्य यासाठी करतात हे महत्त्वाचे आहे.[२]

**लहान व सीमांत शेतकऱ्यांना लाभदायी:**

शासनामार्फत शेती आणि शेतकरी यांच्या विकासासाठी अनेक योजना सुरु करण्यात आल्या आहेत जसेकी नुकसान भरपाई योजन, पिका विमा योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना, किसान क्रेडीट कार्ड योजना या सारख्या योजना जरी शासनामार्फत राबविण्यात येत असल्या तरी या योजनाचा लाभ प्रामुख्याने मोठ्या शेतकऱ्यांनाच जास्त होत असतो. परंतु प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही लहान व सीमांत शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायी ठरलेली योजना आहे. कारण या योजनेमध्ये ज्यांच्याकडे २ हेक्टरपर्यंत कृषी जमीन आहे, अशाच शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. कारण अशा शेतकऱ्यांचे उत्पन्न मर्यादित असून त्यांना शेतीसाठी लागणाऱ्या बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीसाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. PM-KISAN योजनेअंतर्गत दरवर्षी ₹६,००० ची थेट आर्थिक मदत मिळाल्यामुळे या शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार मिळतो.[३]

**कृषी उत्पादकतेत वाढ :**

पीएम किसान किसान सम्मान निधी योजना हि केवळ शेतकऱ्यांना आर्थिक आधारच देत नाही तर हि योजना शेती मधील उत्पादकतेमध्ये वाढ वाढ घडून आणण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे. लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना आपल्या अल्प उतपान्नाच्या आधारे नियमितपणे शेतीसाठी आवश्यक असणारी आदाने नियमितपणे खरेदी करणे शक्य नाही परिणामी उतपादन कार्यात खंड पडून शेतीची उत्पादकता कमी होते. परंतु पीएम किसान किसान सम्मान निधी योजनेमुळे शेतकऱ्यांच्या या समस्येची सोडवणूक करून शेतकऱ्यांना अखंडित शेती उत्पादन घेणे शक्य झाले आहे. त्याचबरोबर उच्च प्रतीची बियाणे, खते तसेच सिंचन सुविधा यामध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे कृषी उत्पादकतेत वाढ होऊन एकूण पीक उत्पादनात लक्षणीय सुधारणा होते.[४]

**ग्रामीण विकासाला चालना**

पीएम किसानच्या सकारात्मक प्रभावाची पोहोच वैयक्तिक लाभार्थ्यांच्या पलीकडे आहे. अंदाजित रोकड गुंतवणुकीमुळे ग्रामीण बाजारपेठा पुनरुज्जीवित झाल्या, कृषी उत्पादनांची मागणी वाढली आणि घरगुती वापराच्या पद्धतींमध्ये सुधारणा झाली. महिलांच्या सक्षमीकरणात, विशेषतः बँक खाती संयुक्तपणे उघडली जातात, अशा ठिकाणी या योजनेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याशिवाय, एक समग्र आणि परस्परसंलग्न ग्रामीण विकास परिसंस्था तयार करून, ही योजना मृदा आरोग्य कार्ड, किसान क्रेडिट कार्ड, पीएम पीक विमा योजना आणि ई-नाम यासारख्या इतर महत्त्वाकांक्षी योजनांना पूरक ठरली आहे. शेतकऱ्यांसाठी पेन्शन योजना असलेल्या पीएम किसान मानधन योजनेशी त्याचे एकत्रीकरण, हे भारतातील कृषी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा जाळे तयार करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे.[५]

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसमोरील आव्हाने:**

**अल्प अर्थसाहाय्यामुळे शेतकरी वर्गातील नाराजी:**

सरकार कडून किसान सन्मान निधी योजने मार्फत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य दिले जात असले तरी दिले जाणारे सहाय्य हे अपुरे असल्याची टीका काही शेतकरी संघटनांकडून करण्यात आले आहे. भारतीय कृषी संघटना (BKU) यांच्या मते, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत दिली जाणारी वार्षिक ६,००० रुपयांची आर्थिक मदत सध्याच्या आर्थिक परिस्थितीत अपुरी ठरत असून ती प्रत्यक्षात "थट्टाच" ठरली आहे. सरकारकडून वारंवार आश्वासने दिली गेली असली तरी अर्थसंकल्पात ही रक्कम वाढवण्याबाबत कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही, तर हि रक्कम वाढ करून ती १२००० रुपये करावी अशी मागणी या संघटनेमार्फत करण्यात आले आहे.[६]

**पीएम-किसान योजनेच्या नावाने बनावट संदेश आणि ॲप द्वारे नागरिकांच्या फसवणुकीचा धोका:**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-Kisan) योजनेच्या नावाने अनेक बनावट संदेश, लिंक आणि सोशल मीडियावरील पोस्ट्स पसरवल्या जात असल्याबाबत सल्लागार सूचना देण्यात आली आहे. या संदेशांमध्ये अतिरिक्त लाभ देण्याची खोटी आश्वासने, बनावट नोंदणी लिंक किंवा दिशाभूल करणारी अद्ययावत माहिती दिलेली असते. अशा प्रकारच्या माहितीमुळे फसवणूक होण्याचा किंवा वैयक्तिक माहिती चोरीला जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. सरकारने नागरिकांना इशारा दिला आहे की अशा अप्रमाणित व अविश्वसनीय माहितींवर विश्वास ठेवल्यास किंवा त्यामध्ये सहभागी झाल्यास, आपल्या कायदेशीर हक्कांवरील लाभ तसेच मेहनतीने कमावलेले उत्पन्न धोक्यात येऊ शकते.[७]

**नोंदणी मधील त्रुटी:**

न्यूजलाँड्री या डिजिटल वृत्तवाहीनीनुसार किसान सन्मान निधी योजना राबवत असताना शेतकऱ्यांच्या नोंदणीमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी दिसून येत आहेत यामुळे अपात्र व्यक्ती याचा लाभ घेताना दिसून येत आहेत याचे उदाहरण म्हणजे आसाममध्ये ८.३५ लाख बनावट शेतकऱ्यांना ५५८ कोटी रुपये देण्यात आल्याचे उघड झाले. कर्नाटकमध्ये ४ लाख अपात्र शेतकऱ्यांनी ४४० कोटी रुपये लाटले. तामिळनाडूमध्ये सुमारे ६.९७ लाख अपात्र शेतकऱ्यांना ३२१ कोटी रुपये मिळाले, तर उत्तर प्रदेशमध्ये तब्बल २१ लाख "शेतकऱ्यांनी" नाहक लाभ घेतल्याचे आढळून आले आहे. कृषी कुटुंब स्थिती मूल्यांकन सर्वेक्षण Situation Assessment of Agricultural Households (SAAH) नुसार, भारतातील कृषी कुटुंबांची संख्या सुमारे ९.३ कोटी इतकी होती. विशेष म्हणजे या सर्वेक्षणात भाडेपट्ट्यावर शेती करणारी कुटुंबेही समाविष्ट होती. असे असताना भाडेपट्ट्यावर शेती करणारी कुटुंबे योजने मध्ये समाविष्ट नसताना देखील ११ कोटी पेक्षा जास्त लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली होती यावरून हे स्पष्ट होत आहे कि भाडेपट्ट्यावर शेती करणारी कुटुंबे ज्यांना या योजनेच्या लाभाची आवश्यकता आहे ते या योजनेपासून वंचित राहत आहेत तर इतर अपात्र नागरिक या योजनेचा लाभ घेत आहेत.[८]

**प्रशासकीय अडथळे:**

पीएम किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्याच्या उदात्त उद्देशाने सुरू करण्यात आली होती. योजनेनुसार अर्जांची प्रक्रिया ३० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक आहे, त्यापैकी १५ दिवस तहसील स्तरावर आणि उर्वरित १५ दिवस उपसंचालक (कृषी) स्तरावर. मात्र, उत्तर प्रदेशातील मिर्झापूर जिल्ह्यांतील प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच चित्र दाखवते. अनेक शेतकऱ्यांच्या मते, अर्ज प्रक्रियेत ठरवून दिलेल्या कालमर्यादेपेक्षा खूप जास्त विलंब होत आहे. अपुरी पायाभूत सुविधा आणि नोकरशाहीतील लालफितीचा कारभार यामुळे निधी वेळेवर वितरित होत नाही, परिणामी शेतकरी वर्गात निराशा व असंतोष वाढत आहे. योजनेची संकल्पनात्मक रचना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील ही तफावत, लक्षित सुधारणा व व्यापक जनजागृतीची गरज अधोरेखित करते. वारंवार पाठपुरावा करूनही, शेतकऱ्यांना त्यांच्या PM-Kisan अर्जांच्या प्रक्रियेत अन्यायकारक विलंबाचा सामना करावा लागत आहे. अशाच एका प्रकरणात, तहसीलदार हेमंत कुमार यांनी एका वर्षाहून अधिक काळ अर्ज प्रलंबित ठेवला, जो ठरवून दिलेल्या कालमर्यादेचा स्पष्ट भंग असून, योजनेच्या मूळ उद्देशालाच काळिमा फासणारा आहे. सरकार अनेकदा PM-Kisan योजनेच्या कार्यक्षमतेबाबत दिलेल्या आश्वासनांचा उल्लेख करतात, मात्र ती कार्यक्षमता केवळ घोषणांपुरतीच मर्यादित राहिल्याचे दिसते. या विलंबामुळे कार्य प्रणालीवरील विश्वास ढासळतो.[९]

**निष्कर्ष**

किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांच्या आर्थिक सबलीकरणाच्या दृष्टीने एक महत्वाच पाऊल आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य मिळून त्यांच्या तातडीच्या गरजा पूर्ण होतात. विशेषतः लहान

व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ही योजना उपयुक्त ठरली आहे. तथापि, या योजने मार्फत मिळणारे अर्थसहाय्य हे कमी असल्यामुळे ही योजना शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांचे निराकरण करू शकत नाही. रकमेची मर्यादा, अपूर्ण कव्हरेज, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय त्रुटी यामुळे योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यामध्ये अडचणी येत आहेत . म्हणून या योजनेला इतर कृषी सुधारणा उपायांसोबत जोडणे आवश्यक आहे.

**शिफारशी :**

१. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक ६,००० रुपये इतकी रक्कम अर्थसहाय्याच्या स्वरुपात दिली जाते. परंतु, वाढत्या शेती उत्पादन खर्चाचा विचार केला असता हि रक्कम अत्यंत अपुरी आहे. बियाणे, खत, कीटकनाशके, सिंचन, मजुरी आणि वाहतूक खर्च सातत्याने वाढत असल्यामुळे या अर्थ सहाय्यामध्ये योग्य ती वाढ करण्याचा विचार करण्यात यावा विचार करण्यात यावा.

२. जमीन स्वतःच्या नावावर असलेल्या शेतकऱ्यांनाच या योजनेचा लाभ मिळतो. परंतु भाडेतत्वावर जमीन घेऊन प्रत्यक्ष शेती करणारा मोठा शेतकरी वर्ग जमिनीचा मालक नसल्यामुळे या योजनेपासून वंचित राहत आहे. म्हणून योजनेची व्याप्ती वाढवून प्रत्यक्ष शेती करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा या योजनेमध्ये समावेश करावा.

३. चुकीची नोंद, नावातील फरक, सातबारा अद्ययावत नसणे यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहतात. त्याचा वेळेस कागदपत्रे अद्यावत ठेवणारा परंतु प्रत्यक्ष शेती नकारणारा मोठा वर्ग या योजनेचा लाभ घेत आहे. त्यामुळे ग्रामपातळीवर महसूल व कृषी विभागाच्या समन्वयातून विशेष मोहिमा राबवून या त्रुटी दूर कराव्यात.

४. ई-केवायसी, आधार-बँक जोडणी, ऑनलाइन नोंदणी यासारख्या प्रक्रियांमध्ये अशिक्षित शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी येतात. परिणामी हे गरजू शेतकरी या योजने पासून वंचित राहतात. म्हणून शासनाने कृषी सेवा केंद्रे, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष तांत्रिक सहाय्य करावे.

**सारांश:**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला आधार देणारी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेअंतर्गत लहान व सीमांत शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपये इतकी आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात दिली जाते. या योजनेचे मुख्य महत्त्व म्हणजे शेतकऱ्यांना किमान उत्पन्नाची हमी मिळणे, कृषी उत्पादनासाठी कर्जावरचे अवलंबीत्व कमी करणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य मजबूत करणे हा या योजनेचा सकारात्मक परिणाम आहे. तर या योजनेसमोर काही आव्हानेही आहेत. जसे कि लाभार्थ्यांची अचूक ओळख न होणे, नोंदीतील त्रुटी, तसेच, वाढती महागाई लक्षात घेता वार्षिक ६००० रुपये हि रक्कम अपुरी ठरत असल्याची टीकाही होत आहे. त्याचबरोबर भूमिहीन शेतमजूर, भाडेकरू शेतकरी यांचा योजनेत समावेश नसणे ही देखील एक मर्यादा आहे. त्यामुळे योजना अधिक प्रभावी होण्यासाठी रक्कम वाढविणे, लाभार्थी निवडीचे निकष सुधारित करणे आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**

१. All about agriculture, 6 October 2025, 'PM-Kisan Samman Nidhi https://allaboutagriculture.in/pm-kisan-samman-nidhi/

२. डॉ. प्रमोद मेहेरदा आणि अरिंदम मोडक, २ऑगष्ट २०२५ प्रधानमंत्री किसान सन्मान निधी नवशक्ती ई वृत्तपत्र

https://marathi.freepressjournal.in/opinion/pm-kisan-yojana-modi-government-schemes

३. https://www.kisaanhelpline.com/pm-kisan-samman-nidhi-yojana

४. Team lead, 2nd June 2023, Adda Current Affairs, PM-Kisan Scheme: Empowering Indian Farmers for a Resilient Agriculture Sector https://currentaffairs.adda247.com/pradhan-mantri-kisan-samman-nidhi-pm-kisan-scheme/

५. डॉ. प्रमोद मेहेरदा, अरिंदम मोडक २ऑगष्ट २०२५ नवशक्ती ई वृत्तपत्र 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी'. https://marathi.freepressjournal.in/opinion/pm-kisan-yojana-modi-government-schemes

६. Jaskaran Singh, 2nd February , 2026, the Times of India , 'Farmer body terms Union Budget 'disappointing, far from reality'. http://timesofindia.indiatimes.com/articleshow/127847047.cms

७. Sneha Kulkarni, 21 Jul 2025, economic times, 'pm-kisan-beneficiaries-alerted-against-fake-messages-and-fraudulent-claims'. https://economictimes.indiatimes.com/wealth/save/pm-kisan-beneficiaries-alerted-against-fake-messages-and-fraudulent-claims/articleshow/122815847.cms

८. Chintan Patel, 24 April 2024, Newslaundry, 'In PM-KISAN, some relief to farmers, but exclusion and missed income goal point to holes' https://www.newslaundry.com/2024/04/24/in-pm-kisan-some-relief-to-farmers-but-exclusion-and-missed-income-goal-point-to-holes

९. Yogi M. P. Singh, 20 August 2025, yogi.systems 'PM Kisan Samman Nidhi: A Promise Delayed – Farmers Demand Accountability'. https://yogi.systems/2025/08/20/pm-kisan-samman-nidhi-application-delays-explained/